सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक १४४२(२)(२)/२०१९/२३ दिनांक: २२ नोव्हेंबर, २०२१

## -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय :- महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब मुख्य परीक्षा-२०१९ (पोलीस उपनिरीक्षक) नाशिक केंद्रावरील दिनांक २९ नोव्हेंबर, २०२१ ते ३ डिसेंबर, २०२१ या कालावधीतील शारीरिक चाचणी व मुलाखतीचा कार्यक्रम पुढे ढकलण्याबाबत.**

संदर्भ :- (१) जाहिरात क्रमांक ०१/२०१९ व अधिसूचना क्र. ०८/२०१९.
(२) आयोगाचे दिनांक १२ ऑक्टोबर, २०२१ रोजीचे प्रसिध्दीपत्रक.
(३) आयोगाचे दिनांक २१ ऑक्टोबर, २०२१ रोजीचे प्रसिध्दीपत्रक.

महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब मुख्य परीक्षा २०१९-(पोलीस उपनिरीक्षक) च्या लेखी परीक्षेच्या दिनांक ३ ऑगस्ट, २०२१ रोजी जाहीर करण्यात आलेल्या सुधारित निकालाच्या आधारे शारीरिक चाचणीकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांचा प्रथम टप्प्यातील कोल्हापूर, पुणे व नाशिक या केंद्रावरील शारीरिक चाचणी व मुलाखतीचा कार्यक्रम संदर्भित दिनांक २१ ऑक्टोबर, २०२१ रोजीच्या परिपत्रकान्वये प्रसिध्द करण्यात आला आहे. तथापि, नाशिक केंद्रावरील दिनांक २९ नोव्हेंबर, २०२१ ते ३ डिसेंबर, २०२१ या कालावधीतील शारीरिक चाचणी व मुलाखतीचा कार्यक्रम मा.अध्यक्ष, महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांच्या प्रकृती अस्वास्थ्याच्या कारणास्तव पुढे ढकलण्यात येत आहे. तसेच प्रस्तुत केंद्रावरील दिनांक ३ डिसेंबर, २०२१ रोजीचा अपिलाचा कार्यक्रमही पुढे ढकलण्यात येत आहे. सदर कालावधीतील उमेदवारांचा शारीरिक चाचणी व मुलाखतीचा तसेच अपिलाचा सुधारित कार्यक्रम स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येईल.

ठिकाण- मुंबई

सचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग